नि.फौ.ख.क्र.४५/२०१९
शासन वि. इजाज अहमद
नि.क्र. ६९

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.७**

नावः आशा शंकर कुंभरे,

वयः ५० वर्ष, धंदाः म.पो.ह.,

पत्ताः पो.स्टे. बुटीबोरी, जि. नागपूर

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र ७ याचा सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस. व्ही. तलमले यांच्यामार्फत शपथेवर सुरुः**

**१.** मी सन २०१६ ते २०२१ या काळात पो.ह. या पदावर पो.स्टे. पारशिवणी येथे कार्यरत होती. दि. २५/०८/२०१७ रोजी मी स्टेशन डायरी अंमलदार म्हणून कार्यरत होती. त्या रोजी सलीम करीम पटेल हे त्याच्या शेतातील धुरावरील झाडे त्यांचे दोन नातेवाईक व एक इसम यांनी कापल्याबाबत तक्रार देण्याकरिता आले होते. मी त्यांची तक्रार नोंदवून घेतली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी व फिर्यादीची सही आहे. त्यातील मजकूर फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे लिहीला आहे. त्यास **नि. क्र. ७०** देण्यात येते. छापील प्रथम खबर अहवाल नोंदविला. आता मला सदर अहवाल दाखविण्यात आला त्यावर फिर्यादीचे व माझी सही आहे. त्यास **नि. क्र. ७१** देण्यात येते. पुढील तपास शैलेश रामटेके यांच्याकडे देण्यात आला.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपी क्र.१ व २ तर्फे श्री पी. एस. सायरे वकील साहेब यांच्यामार्फत उलटतपास शपथेवर सुरुः–**

२. हे म्हणणे खरे आहे की, कोणताही पदभार घेता वेळेस स्टेशन डायरीवर

नोंद घेते. त्यारोजी मी स्टेशन डायरीमध्ये नोंद घेतली आहे. त्या नोंदीची प्रत मला तपास अंमलदार यांनी मागितली नव्हती किंवा मी दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, गुन्हा नोंदविण्याचा आदेश पो.निरीक्षक देतात. कथित गुन्हा नोंदविण्यापूर्वी पो. निरीक्षक यांचा आदेश घेतला होता. पो. निरीक्षकांनी मला तोंडी आदेश दिला होता. त्याबाबतची नोंद स्टेशन डायरीला घेतली होती. त्या नोंदीची प्रत मी तपासी अंमलदार यांना दिला नाही. फिर्याद देता वेळीस मी फिर्यादीचे ओळखपत्र पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद देण्यास विलंब झाल्यास त्याचे कारण फिर्यादीला विचारावे लागते. कथित घटनेची तारीख मी आज रोजी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की प्रत्येक शेतीला सर्वे नंबर असतो. कथित घटना कोणत्या सर्वे नंबरमध्ये घडली ते आज रोजी मी सांगू शकत नाही,फिर्यादमध्ये नमूद आहे. फिर्यादी कथित नंबर सोबत संबंधित असल्याबाबत मी दस्त पाहिले नव्हते. कथित फिर्याद विलंबाणे नोंदविण्याबाबत कारणे मी फिर्यादीला विचारले होते. ते कारण फिर्यादमध्ये का नमूद केले नाही याचे कारण सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटी फिर्याद नोंदवून घेतली. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.08.11 16:45:55 +0530

**(जी.ओ. वानखडे)**

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

समक्ष,

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.08.11 16:46:00 +0530

**(जी.ओ. वानखडे)**

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

दिनांकः ११/०८/२०२५